**ठळक बातम्या**

- जगाच्या कल्याणासाठी बिम्सटेक हे उपयुक्त व्यासपीठ असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन/ बिम्सटेक चेंबर ऑफ कॉमर्सच्या स्थापनेची केली घोषणा

- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित

- प्रख्यात चित्रपट अभिनेता आणि दिग्दर्शक निर्माता मनोज कुमार यांच्या निधनामुळं चित्रपट सृष्टीवर शोककळा/ मान्यवरांनी वाहिली आदरांजली

**आणि**

- नांदेड जिल्ह्यात आलेगाव इथं ट्रॅक्टर विहिरीत कोसळून ६ महिलांचा मृत्यू

**<><><><><>**

जगाच्या कल्याणासाठी बिम्सटेक हे उपयुक्त व्यासपीठ असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. बँकॉक इथं सहाव्या बिम्सटेक संमेलनात आज ते बोलत होते. बिम्सटेकच्या सदस्य देशांमधे सहकार्यासाठी २१ कलमी कार्यक्रम प्रधानमंत्र्यांनी प्रस्तावित केला. बिम्सटेक चेंबर ऑफ कॉमर्सच्या स्थापनेची तसंच आपत्ती व्यवस्थापनातल्या उत्कृष्टतेचं केंद्र भारतात स्थापन करण्याची घोषणाही त्यांनी केली.

बांगला देशचे मुख्य सल्लागार मुहम्मद युनुस यांच्याशी मोदी यांनी आज द्विपक्षीय चर्चा केली.

थायलंडचा दौरा आटोपून प्रधानमंत्री मोदी आज श्रीलंकेला जाणार आहेत. चालू कार्यकाळातली ही त्यांची चौथी श्रीलंका यात्रा आहे.

**<><><><><>**

संसदेच्या दोन्ही सभागृहाचं अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं कामकाज आज संस्थगित झालं. ३१ जानेवारी रोजी सुरू झालेल्या या अधिवेशनात ११८ टक्के

काम झालं असून लोकसभेत १६ तर राज्यसभेत १४ विधेयकं समंत झाली. या अधिवेशनात भरीव विधायक कामकाज झाल्याचं संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितलं.

वक्फ सुधारणा विधेयकावर लोकसभेत १४ तास तर राज्यसभेत १७ तास चर्चा झाली, चर्चेदरम्यान एकदाही व्यत्यय आला नाही असं संसदीय कार्य मंत्री किरेन रिजीजू यांनी सांगितलं. हे विधेयक सरकारने बळजबरीने पारीत करून घेतल्याचा काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांचा आरोप रिजिजू यांनी फेटाळून लावला. सभापती ओम बिर्ला यांनीही हे विधान दुर्दैवी असल्याचं म्हटलं आहे.

अमेरिकेने भारतावर लादलेल्या शुल्कावरून विरोधी पक्षांनी गदारोळ केल्यामुळे लोकसभेचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं होतं. वक्फ सुधारणा विधेयक हा संविधानावरील हल्ला असल्याच्या सोनिया गांधी यांच्या वक्तव्यावरून सत्ताधारी खासदारांनीही घोषणाबाजी केली आणि गांधी यांनी माफी मागावी, अशी मागणी केली.

राज्यसभेत पश्चिम बंगालमधल्या शिक्षक भरतीवरून सत्ताधारी खासदारांनी गदारोळ केला. त्यामुळे राज्यसभेच्या अध्यक्षांनी दुपारी बारा वाजेपर्यंत कामकाज तहकूब केलं. कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतरही गोंधळ कायम राहिल्याने कामकाज दुपारी एक वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

वक्फ (सुधारणा) विधेयक, २०२५ काल राज्यसभेत मंजूर करण्यात आलं. सुमारे १२ तासांच्या चर्चेनंतर १२८ सदस्यांनी या विधेयकाच्या बाजूनं, तर, ९५ सदस्यांनी या विधेयकाच्या विरोधात मतदान केलं. हे विधेयक लोकसभेत आधीच मंजूर झालं आहे.

संसदेनं मुस्लिम वक्फ रद्द करणे विधेयक, २०२५ लाही मान्यता दिली, ज्याच्या प्रभावामुळे मुस्लिम वक्फ कायदा १९२३ रद्द होतो. हे विधेयकही काल राज्यसभेत मंजूर करण्यात आलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी वक्फ सुधारणा विधेयक संमत झाल्याबद्दल समाधान व्यक्त केलं आहे. वक्फच्या मालमत्तेचं व्यवसथापन यामुळे पारदर्शी आणि सर्व मुस्लिमाना फायद्याचं ठरेल अशी प्रतिक्रीया त्यांनी दिली आहे.

मुस्लीम राष्ट्रीय मंचाचे इरफान अली पीरजादे यांनी यासंदर्भात प्रतिक्रीया दिली....

**होल्ड - बाईट....**

**<><><><><>**

महाराष्ट्र सरकारने उत्तर कर्नाटकात पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी वारणा आणि कोयना प्रकल्पातून कृष्णा नदीत, किंवा उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडावं अशी मागणी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं असून, गेल्या अनेक वर्षांपासून कर्नाटक मधल्या नागरिकांची पिण्याची पाण्याची व्यवस्था करण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल महाराष्ट्र सरकारचे आभार मानले आहेत.

**<><><><><>**

पुण्यातल्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात तातडीनं उपचार न मिळाल्यानं तनिषा भिसे या महिलेचा मृत्यू झाल्याप्रकरणी तज्ञ डॉक्टरांच्या समितीद्वारे चौकशी करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. पवार यांनी पुणे जिल्हाधिकाऱ्यांकडून या घटनेबाबत संपूर्ण माहिती घेतली. आरोग्य विभागानं तातडीनं, पारदर्शक आणि निष्पक्षपणे चौकशी पूर्ण करावी, अशा सूचना त्यांनी दिल्या. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल.

तसंच अशा घटना भविष्यात घडू नयेत यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या स्पष्ट सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. सर्व नागरिकांनी संयम बाळगावा आणि प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे.

<><><><><>

हिंदी चित्रपटसृष्टीतले ज्येष्ठ अभिनेते आणि दिग्दर्शक मनोज कुमार यांच्या निधनामुळे चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. मनोज कुमार यांचं आज सकाळी मुंबई इथल्या कोकिलाबेन अंबानी रुग्णालयात निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर उद्या सकाळी अकरा वाजता मुंबईत शासकीय इतमामाने अंत्यसंस्कार होणार आहेत.

देशभक्तीपर चित्रपटांसाठी ओळखले जाणारे मनोज कुमार हे भारत कुमार या टोपणनावानेही ओळखले जात. त्यांचं मूळ नाव हरिकृष्ण गिरी गोस्वामी असं होतं. त्यांचा जन्म २४ जुलै १९३७ मध्ये तत्कालीन वायव्य सिंध प्रांतातल्या एबटाबाद इथे झाला होता. वो कौन थी, शहीद, हिमालय की गोद में, गुमनाम, पत्थर के सनम, नीलकमल, रोटी कपडा और मकान, क्रांती, पूरब और पश्चिम हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत. देशभक्त नायक म्हणून त्यांनी साकारलेल्या रुपेरी पडद्यावरच्या व्यक्तिरेखांमुळे भारतकुमार हे टोपणनाव मिळालं. भारतीय चित्रपटसृष्टीतल्या त्यांच्या योगदानामुळे त्यांना फिल्मफेअर पुरस्कार, दादासाहेब फाळके पुरस्कार आणि पद्मश्री सन्मानाने गौरवण्यात आलं होतं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मनोज कुमार यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. मनोज कुमार यांनी भारतीय चित्रपटसृष्टीवर अमिट छाप सोडली आहे. त्यांच्या दीर्घ कारकिर्दीत त्यांनी देशभक्तीपर चित्रपट बनवून भारतीय मूल्यांविषयी अभिमानाची भावना जागृत केली, असं राष्ट्रपती समाजमाध्यमावरच्या आपल्या शोकसंदेशात म्हणाल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मनोज कुमार यांच्या

निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. मनोज कुमार यांनी आपल्या अभिनय आणि चित्रपट निर्मितीच्या माध्यमातून राष्ट्राभिमानाची भावना सदैव जागृत ठेवली. ही भावना पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देत राहिल, असं प्रधानमंत्री समाजमाध्यमावरच्या आपल्या शोकसंदेशात म्हणाले आहेत.

सरंक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनीही मनोज कुमार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. मनोज कुमार यांच्या निधनामुळे भारतीय चित्रपटसृष्टीची मोठी हानी झाली आहे, असं केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी देखील मनोज कुमार यांच्या निधनाविषयी शोक व्यक्त केला आहे. मनोज कुमार यांनी त्यांच्या चित्रपटांमधून देशभक्तीचं मूल्य रुजवलं. ते खरोखरच भारत कुमार या नावाप्रमाणे जगले, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोकभावना व्यक्त केल्या आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही मनोज कुमार यांच्या उपकार, रोटी कपडा और मकान आणि क्रांती यांसारख्या चित्रपटांद्वारे त्यांची अढळ राष्ट्रभक्ती प्रतीत होत असल्याची भावना आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही मनोज कुमार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. त्यांनी आपल्या चित्रपटातून भारताच्या स्वातंत्र्यासाठी शूरवीरांनी दिलेल्या बलिदानाची जाणीव सर्वांना करून दिली, असं शिंदे आपल्या शोकसंदेशात म्हणाले आहेत.

**<><><><><>**

आकाशवाणीच्या लोकप्रिय कार्यक्रम निर्मात्या सुषमा हिप्पळगावकर यांचं काल मुंबईत निधन झालं. त्या ७३ वर्षांच्या होत्या.  आकाशवाणी मुंबई केंद्रातून कार्यक्रम अधिकारी म्हणून त्यांनी २००६मधे स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. नागपूर मध्ये लोकमत मधून त्यांनी पत्रकार म्हणून काही काळ काम केलं होतं. आकाशवाणी मुंबई केंद्रात नभोनाट्य, वनिता मंडळ, साप्ताहिक स्वास्थ्य सेवा, आरोग्यम

धनसंपदा, अशा विविध सदरांमधून त्यांनी सकस आणि दर्जेदार कार्यक्रम सादर केले आणि ते श्रोत्यांच्या पसंतीस उतरले. प्रसन्न आवाज आणि संवादातली आपुलकी, हे त्यांच्या सादरीकरणाचं वैशिष्ट्य होतं.

**<><><><><>**

नांदेड तालुक्यात आलेगाव इथं आज सकाळी मजुरांना घेऊन जाणारा ट्रॅक्टर विहिरीत कोसळल्यानं ६ महिलांचा मृत्यू झाला. या मजुरांना भुईमूग निंदणीसाठी घश्रेऊन गेलेल्या ट्रॅक्टरच्या चालकाचा ताबा सुटल्यानं ट्रॅक्टर ट्रॉलीसह ते विहिरीत कोसळले. जवळच काम करत असलेल्या शेतमजुरांनी विहिरीत पडलेल्या दोन महिला आणि एका पुरुष मजुराला बाहेर काढलं. त्यानंतर नांदेड जिल्हा प्रशासन, नांदेड महापालिका अग्निशमन दल यांनी बचाव कार्य सुरू केलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

**//<><><><><>//**